MHSN060003492020

**नि.दि.दा.क्र.४१/२०२०**

करमुन्नीसा अयुब बाणदार

**विरुध्द**

नजमुन्नीसा मुस्लीम मुजावर वगैरे

## नि.क्र.१२६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.२२ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत मान्य करण्यात यावी अशी विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत प्रतिवादी ह्या वयस्कर असल्याने वयोमानाने त्यांची तब्येत ठिक नसते त्यामुळे त्यांना मुदतीत न्यायालयात हजर राहता आले नाही. म्हणुन त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. सबब त्यांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन सोबत दिलेली कैफियत पुरसिस अभिलेखावर घेणेबाबत विनंती केली आहे.

०२. वादीने सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे सादर केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जासोबत वैद्यकीय दाखला जोडला नाही. सबब त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०३. दावा हा सरस निरस मानाने तुटक वाटप होवुन कब्जा मिळणेकरीता व हक्कज्ञापनाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी २२ हे दाव्याचे समन्सची बजावणी होवुन देखील ते प्रस्तुत दावेकामी हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.२२ हे वयस्कर असल्याने त्यांना मुदतीत न्यायालयात हजर राहता आले नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.२२ यांनी

त्यांची कथने शपथेवर सांगितली आहेत. अर्जात नमुद कारणे विचारात घेता प्रतिवादी क्र.२२ यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द केल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. तसेच नैसर्गिक न्यायत्वाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी क्र.२२ यांना कैफियत देण्याची संधी देणे योग्य व न्यायाचे आहे. मात्र प्रतिवादी क्र.२२ यांच्या विलंबामुळे झालेली गैरसोयही विचारात घेणे आवश्यक आहे. सबब, उभयतांमधील वाद अंतिमतः गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र.२२ यांचा अर्ज रक्कम रु.२००/– खर्च म्हणून वादीस देण्याच्या अटीवर त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्याय्य व योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आ दे श**

प्रतिवादी क्र.२२ यांनी वादीस रु.२००/– एकत्रीत (रुपये दोनशे मात्र) खर्च म्हणून देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

KHULAPE VINOD VILAS Digitally signed by KHULAPE VINOD VILAS

मिरज. ( वि.वि. खुळपे )

दि.०६/०७/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज